महाराष्ट्र टाइम्स मरिन ड्राइव्ह POINT

गुढीपाडवा विशेष



# बालाजी, जगन्नाथ आणि सिद्धेश्वरही

## देवळांच्या गावा...

डॉ. तुषार यशवंत सावडावकर

बाणगंगा परिसरातल्या आणखी काही प्राचीन मंदिरांचा आज परिचय करून घेऊ.

### श्री व्यंकटेश बालाजी मंदिर



बाणगंगा तलावाच्या पूर्वेकडच्या कोपऱ्यात प्राचीन काळातल्या मराठा स्थापत्य शैलीचा (१७८०-१८१८) उत्कृष्ट नमुना असलेलं श्री व्यंकटेश बालाजी मंदिर आहे. हे अनेक भाविकांचं श्रद्धास्थान असून वसई, विरार, नायगाव परिसरातल्या कोळीबांधवांचं तसंच अनेकांचं कुलदैवत आहे. श्री बालाजींचे परमभक्त असलेल्या रामशंकर भवानीशंकर दवे यांच्या इच्छेनुसार त्यांनी नेमलेल्या दोन विश्वस्तांनी दवे यांचे परममित्र रामा शेणवी लोटलीकर यांनी देणगीपत्राद्वारे दिलेल्या जमिनीवर १७८९मध्ये हे मंदिर बांधलं. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी द्वारपाल असून प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. मुख्य प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूला डाव्या हातास श्री व्यंकटेश बालाजीचं वाहन गरुड व रिद्धीसिद्धी गणपती यांच्या संगमरवरी मूर्ती व दीपमाळ आहे. पूर्ण मंदिर लाकूड व दगडात कोरलेलं आहे.

गाभाऱ्यासमोर भव्य सभामंडप असून सभामंडपाच्या डाव्या बाजूला गाभाऱ्याच्या द्वारजवळ उभे असलेले धर्नुधारी बजरंगबली व उजव्या बाजूला श्री गणपती अशा संगमरवरी मूर्ती आहेत. गाभाऱ्यात श्री व्यंकटेश बालाजींची संगमरवरी मूर्ती असून ही मूर्ती पश्चिमाभिमुख आहे. ही मूर्ती दक्षिण भारतातून आणली आहे. या मूर्तीचं वैशिष्ट्य म्हणजे मूर्तीचे डोळे उघडे आहेत. देवतेच्या मूर्तीच्या डाव्या हाताला श्री अंबामातेची संगमरवरी मूर्ती आहे. श्री व्यंकटेश बालाजी मंदिराचा वार्षिक उत्सव आश्विन प्रतिपदेला घटस्थापनेला सुरू होऊन त्याची सांगता आश्विन शुद्ध एकादशीला पालखी सोहळ्याने होते. राज्य सरकारने फेब्रुवारी २००५ मध्ये मंदिराचा जीर्णोद्धार करून मूर्तीची पूर्ण प्राणप्रतिष्ठा केली.

### श्री जगन्नाथ मंदिर

हे मंदिर बाणगंगेच्या मुख्य प्रवेशद्वारालगत असून ते १८५८मध्ये लक्ष्मीदास जगजीवनदास या व्यापाऱ्याने बांधलं होतं. बालाजी



मंदिराप्रमाणेच या मंदिराच्या प्रवेशद्वारावर नौबतखाना आहे जिथे मंदिरातले संगीतकार बसलेले असत. या मंदिरात लाकडाचा जुना दरवाजा पाहायला मिळतो. बालाजी मंदिरानंतर या मंदिराच्या आवारात आकर्षक मंदिर, मुख्य दरवाजा, दीपस्तंभ व धर्नशाळा असलेली एक आकर्षक इमारत पाहायला मिळते. मंदिर पश्चिमाभिमुख आहे.

या मंदिराच्या गाभाऱ्यात एक पितळेच्या योनीवर ठेवलेलं जवळपास ९ फूट उंच दगडी शिवलिंग आढळते आणि त्यावर कलश टांगलेला असून त्यातून शिवलिंगावर सतत अभिषेक होत असतो. इथे पार्वतीची संगमरवरी मूर्तीसुद्धा आहे. गाभाऱ्यासमोर दगडी नंदी आहे. या मंदिरात गणपतीचीही एक मूर्ती आहे. या मंदिराच्या दक्षिणेला सभामंडप आहे. या मंदिरात दोन दीपस्तंभही आहेत.

### श्री परशुराम मंदिर

परशुराम मंदिराचं भूमिपूजन ऑगस्ट १९६५मध्ये 'माजी की वाडी' इथे करण्यात आलं. ही जागा हरिगंगा राधेदास भन्साळी यांनी मंदिरासाठी ११ फेब्रुवारी १९६५ रोजी दान केलं. या देवळात एक



चांदीची परशुरामाची प्रतिमा एका संगमरवरी कमळाच्या फुलावर उभारलेली आहे. मूर्तीच्या बाजूला लाकडाचं सुंदर कोरीवकाम केलं असून गाभाऱ्यात बाल श्रीकृष्णाची छोटी प्रतिमा आहे. मंदिरातल्या एका फलकावर प्रत्येक दिवशीचा सूर्योदयाची आणि सूर्यास्ताची वेळ लिहिली जाते. सूर्योदय व सूर्यास्त ही दोन नैसर्गिक तालचक्रं आहेत व यावर अग्निहोत्राची प्रक्रिया आधारित असते. या मंदिराला लागून हनुमानाचं एक प्राचीन मंदिर आहे.

### श्री जाबरेश्वर महादेव मंदिर

जाबरेश्वर मंदिर एका चौथऱ्यावर वसलं असून एका काळ्या दगडावर बांधलेलं आहे. या मंदिराची स्थापना १८४०मध्ये सर मंगलदास नथुभाई या व्यापाऱ्याचे वडील नथुभाई रामदास यांनी केली. या मंदिरास जाबरेश्वर असं नाव देण्यात आलं कारण हे मंदिर जबरदस्तीने बांधण्यात आलं होतं, असा समज आहे.

मंदिराचं प्रवेशद्वार पूर्व दिशेला आहे. या मंदिराचं एकमेव वैशिष्ट्य म्हणजे देखणा आणि आकर्षक गाभारा. मंदिराच्या कळसावर अनेक देवींच्या प्रतिमा



कोरलेल्या आहेत.

गाभाऱ्यात एक नऊ इंच उंचीची दगडी पिंडी एका पितळेच्या योनीवर ठेवलेली आहे. भिंतीच्या मागच्या बाजूला पार्वतीची एक फुटापेक्षा जास्त उंचीची संगमरवरी मूर्ती आढळते. सभामंडपात नंदीची दगडी मूर्ती आहे. देवालयाच्या प्रवेशद्वाराजवळ दोन फूट उंचीची पार्वतीची मूर्ती आहे.

### सिद्धेश्वर मंदिर

सिद्धेश्वर मंदिर हे एकेकाळी जयरामगीर बाबाचा मठ म्हणून ओळखलं जात असे. इथे जयरामगीर बाबांच्या समाधीसोबत तपस्वी बाबा आणि बुधगीर बाबा यांच्या समाधीही बांधण्यात आल्या. या मंदिराभोवतीचा परिसर आज जामनगिरी चाळ किंवा परेल इस्टेट म्हणून ओळखला जातो. या भव्य परिसरात एक सर्वात मोठं मंदिर सिद्धेश्वर महादेव मंदिर असून ते जवळपास १८३० च्या आसपास एका समाधीवर बांधण्यात आलं. डाव्या बाजूला गणेश आणि उजव्या बाजूला पार्वतीची मूर्ती आहे. देवालयाकडे तोंड कलेली नंदीची दगडी मूर्ती आहे. देवालयाच्या आत चांदीचे नाग असलेलं दगडी शिवलिंग आहे. पार्वतीची मूर्ती भिंतीच्या वरच्या बाजूला आहे. मंदिराचं प्रवेशद्वार पश्चिमाभिमुख आहे.

mtartedit@gmail.com